Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18848570

# धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये प्रशासकीय कार्यक्षमता : सार्वजनिक प्रशासनाचा संकल्पनात्मक अभ्यास

डॉ. भगवानसिंग एम. राजपुत[1] & कल्पना भास्कर मिसाळ[2]

**सारांश :-**

सार्वजनिक धोरणांची प्रभावी अंमलबजावणी ही शासनाच्या कार्यक्षमतेचे एक महत्त्वाचे द्योतक मानली जाते. अनेक प्रसंगी धोरणांची रचना सैद्धांतिकदृष्ट्या सक्षम असली, तरी अंमलबजावणीच्या टप्प्यावर प्रशासकीय अकार्यक्षमता, संस्थात्मक मर्यादा व संसाधनांतील अपुऱ्या व्यवस्थेमुळे अपेक्षित उद्दिष्टे साध्य होत नाहीत. प्रस्तुत लेखात धोरण अंमलबजावणीतील प्रशासकीय कार्यक्षमतेचा सखोल संकल्पनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. धोरण रचना, प्रशासकीय क्षमता, आर्थिक संसाधने, पारदर्शकता, जबाबदारी व स्थानिक प्रशासन या घटकांमधील परस्परसंबंध स्पष्ट करणारी एक संकल्पनात्मक चौकट विकसित करण्यात आली आहे. हा अभ्यास लोकप्रशासन व शासन अभ्यास क्षेत्रातील सैद्धांतिक चर्चेला बळकटी देतो तसेच भविष्यातील अनुभवजन्य संशोधनासाठी एक उपयुक्त विश्लेषणात्मक चौकट प्रदान करतो.

**कीवर्डस् :-** प्रशासकीय कार्यक्षमता, धोरण अंमलबजावणी, सार्वजनिक प्रशासन, पारदर्शकता, जबाबदारी.

**प्रस्तावना :-**

धोरणनिर्मिती, अंमलबजावणी व मुल्यांकन हे सार्वजनिक धोरण प्रक्रियेचे महत्वाचे टप्पे आहेत. यापैकी धोरण अंमलबजावणी हा टप्पा सर्वाधिक गुंतागुंतीचा आणि आव्हानात्मक मानला जातो. भारतासारख्या विकसनशिल देशांमध्ये प्रशासनिक मर्यादा, संसाधनांची कमतरता आणि संस्थात्मक दुर्बलता यामुळे धोरण अंमलबजावणीमध्ये मोठी दरी निर्माण होते.

प्रशासकीय कार्यक्षमता म्हणजे उपलब्ध मनुष्यबळ, निधी व वेळ यांचा योग्य वापर करून धोरणांची उद्दिष्टे प्रभावीपणे साध्य करण्याची प्रशासनाची क्षमता होय. कार्यक्षम प्रशासनाशिवाय कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकत नाही.

[1] मार्गदर्शक, लोकप्रशासन विभाग, एमएसएस कला महाविद्यालय तिर्थपुरी, जि.जालना.

[2] संशोधक विद्यार्थीनी, लोकप्रशासन विभाग, विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

**प्रशासकीय कार्यक्षमता : संकल्पनात्मक पार्श्वभूमी :-**

हर्बर्ट सायमन (1947) यांनी प्रशासकीय कार्यक्षमतेचा संबंध निर्णय प्रक्रियेतील तर्कसंगततेशी जोडला आहे. पारंपारिक सार्वजनिक प्रशासनात नियम, श्रेणीबद्ध रचना आणि नियंत्रणावर भर देण्यात आला; तर आधुनिक प्रशासनात परिणाम, जबाबदारी आणि उत्तरदायित्व या घटकांवर अधिक भर दिला जातो.

समकालीन दृष्टिकोनातून प्रशासकीय कार्यक्षमता ही केवळ खर्च कमी करण्यापुरती मर्यादित नसून, सामाजिक परिणाम साध्य करण्याशी निगडित आहे.

**धोरण अंमलबजावणीतील प्रशासकीय आव्हाने :-**

Pressman आणि Wildavsky (1973) यांच्या मते, धोरण अंमलबजावणी प्रक्रियेत प्रत्येक प्रशासकीय टप्प्यावर उद्दिष्टे दुर्बल होण्याची शक्यता असते. धोरण अंमलबजावणीतील प्रमुख अडथळे पुढीलप्रमाणे आहेत.

1. **विभागातील समन्वयाचा अभाव :-** बहुविभागीय धोरणांमध्ये समन्वय नसल्यामुळे निर्णय प्रक्रियेत विलंब व कार्यक्षमता कमी होते.
2. **लालफितशाही व प्रक्रियात्मक गुंतागुंत :-** अनावश्यक नियम व मंजुरी प्रक्रियेमुळे अंमलबजावणीची गती मंदावते.
3. **राजकीय हस्तक्षेप व प्रशासकीय तटस्थतेचा अभाव :-** धोरणाच्या मुळ उदिष्टांमध्ये विकृती निर्माण होऊन परिणामकारकता कमी होते.
4. **प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता :-** प्रशिक्षित मनुष्यबळ व पुरेशा निधीच्या अभावामुळे धोरणे अपेक्षित दर्जाने राबवली जात नाहीत.
5. **निरीक्षण व मुल्यमापन यंत्रणांचा अभाव :-** प्रभावी मॉनिटरींग प्रणाली व सक्षम स्थानिक प्रशासन नसल्यास धोरणांचे अपेक्षित सामाजिक परिणाम साध्य होत नाहीत.

**संकल्पनात्मक चौकट :-**

या अभ्यासात विकसित करण्यात आलेली संकल्पनात्मक चौकट धोरण अंमलबजावणीतील प्रशासकीय कार्यक्षमतेवर प्रभाव टाकणाऱ्या प्रमुख घटकांना अधोरेखित करते.

1. **धोरण रचना :-** स्पष्ट उद्दिष्टे, निश्चित लाभार्थी गट आणि अंमलबजावणीसाठी ठोस मार्गदर्शक तत्वे असल्यास प्रशासनाला कार्यक्षमतेने काम करता येते.
2. **प्रशासकीय क्षमता :-** प्रशिक्षित अधिकारी, संस्थात्मक बळकटी आणि विभागांतील समन्वय यामुळे धोरण अंमलबजावणी प्रभावी होते.
3. **आर्थिक संसाधने :-** पुरेसा व वेळेवर निधी उपलब्ध झाल्यास धोरणांची अंमलबजावणी सुरळीत होते.

4. **पारदर्शकता व जबाबदारी :-** RTI, सामाजिक लेखापरिक्षण आणि DBT यासारख्या यंत्रणांमुळे प्रशासन अधिक जबाबदार बनते.
5. **स्थानिक प्रशासन व लोकसहभाग :-** स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग धोरण अंमलबजावणी अधिक परिणामकारक बनवतो.

**धोरण अंमलबजावणीतील प्रशासकीय कार्यक्षमता :-**




स्वतंत्र चल (धोरण रचना, प्रशासकीय क्षमता व आर्थिक संसाधने) हे मध्यस्थ चलांद्वारे (पारदर्शकता, जबाबदारी व स्थानिक प्रशासन) आश्रित चलावर म्हणजे धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीवर कसा प्रभाव टाकतात हे दर्शविण्यात आले आहे.

**चलांचे वर्गीकरण :-**

1) **स्वतंत्र चल :-**

1. **धोरण रचना (Policy Design) :-**
अंमलबजावणीसाठी उद्दिष्टांची स्पष्टता, कार्यपद्धतीची सुसंगती व दिशा निश्चित करणारा मुलभूत घटक.

2. **प्रशासकीय क्षमता (Administrative Capacity) :-**
मनुष्यबळ, कौशल्य, संस्थात्मक समन्वय व व्यवस्थापन क्षमतेद्वारे प्रशासनाची कार्यक्षमतेने काम करण्याची क्षमता.

3. **आर्थिक संसाधने (Financial Resources) :-**
निधी व आवश्यक साधनसामुग्रीची पुरेशी व वेळेवर उपलब्धता, जी अंमलबजावणीची गती व परिणामकारकता सुनिश्चित करते.

2) **मध्यस्थ चल (Intervening Variables) :-**

1. **पारदर्शकता (Transparency) :-**
माहितीचा मुक्त प्रवाह व प्रक्रियेतील खुलेपणा ज्यामुळे विश्वासार्हता वाढते.

2. **जबाबदारी (Accountability) :-**
उत्तरदायित्व व नियंत्रण यंत्रणांद्वारे प्रशासनाच्या कार्य प्रदर्शनावर देखरेख ठेवण्याची प्रणाली.

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18848570

3. **स्थानिक प्रशासन (Local Governance) :-**

स्थानिक स्वराज्य संस्था व लोकसहभागाच्या माध्यमातून अंमलबजावणी अधिक परिणामकारक करणारा घटक.

3) **आश्रित चल (Dependent Variable) :-**

1. **धोरणांची प्रभावी अंमलबजावणी (Effective Policy Implementation) :-**

धोरणांची उद्दिष्टे प्रत्यक्षात कितपत साध्य झाली, सेवा लाभार्थ्यांपर्यंत कितपत पोहोचली व अपेक्षित सामाजिक परिणाम कितपत घडले याचे द्योतक.

**संशोधन गृहितके (Hypothesis) :-**

1) स्पष्ट व सुसंगत धोरण रचना प्रशासकीय कार्यक्षमतेवर सकारात्मक प्रभाव टाकते.
2) प्रशासकीय क्षमता (प्रशिक्षण, संस्थात्मक बळकळी, समन्वय) धोरण अंमलबजावणीची कार्यक्षमता वाढवते.
3) पुरेशी व वेळेवर उपलब्ध आर्थिक संसाधने धोरण अंमलबजावणीतील अडथळे कमी करतात.
4) पारदर्शकता व जबाबदारी यंत्रणा प्रशासकीय कार्यक्षमतेमध्ये मध्यस्थ घटक म्हणून कार्य करतात.
5) स्थानिक प्रशासन व लोकसहभाग धोरण अंमलबजावणी अधिक परिणामकारक बनवतो.

**संशोधन पद्धती (Methodology) :-** हा अभ्यास संकल्पनात्मक (Conceptual / Desk-based) स्वरुपाचा आहे.

**संशोधन रचना :-** या संशोधन लेखासाठी विश्लेषणात्मक व सैद्धांतिक पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे.

**माहिती स्त्रोत :-** पुस्तके, संशोधन लेख, सरकारी अहवाल इत्यादी.

**विश्लेषण पद्धत :-** सैद्धांतिक विश्लेषण, तुलनात्मक अभ्यास पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :-**

धोरण अंमलबजावणीतील प्रशासकीय कार्यक्षमता ही केवळ तांत्रिक किंवा व्यवस्थापकिय बाब नसून ती संस्थात्मक, आर्थिक व सामाजिक घटकांशी निगडित आहे. प्रभावी धोरण रचना, सक्षम प्रशासन, पारदर्शकता व स्थानिक सहभाग यांचा समन्वय साधल्याशिवाय सार्वजनिक धोरणांची उद्दिष्टे साध्य होऊ शकत नाहीत.

प्रस्तुत संकल्पनात्मक अभ्यास सार्वजनिक प्रशासनाच्या सैद्धांतिक चर्चेला बळकटी देतो. तसेच धोरण अंमलबजावणीवर आधारित भविष्यातील अनुभवजन्य संशोधनासाठी एक मजबूत चौकट प्रदान करतो.

## संदर्भसूची :-

1) Simon, H.A. (1947). Administrative behaviour: A study of decision-making processes in administrative organizations. Free Press.
2) Pressman, J. L. & Wildavsky, A. (1973). Implementation: How great expectations in Washington are dashed in Oakland. University of California Press.
3) Hood, C. (1991). A public management for all seasons? Public Administration, 69(1), 3-19. https://doi.org/10.111/j.1467-9299. 1991.tb00779.x
4) World Bank. (2017) World development report 2017: Governance and the law. World Bank.
5) Second Administrative Reforms Commission. (2009). Refurbishing of personnel administration. Government of India.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*